ठाणे, गुरुवार दि. १५ ऑगस्ट २०२४ वर्ष : १३, अंक : १०८ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

स्वतंत्रता दिवस

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**अभ्यासू युवकांनी राजकारणात यावे**

सध्या राजकारणात अनागोंदी निर्माण झाली आहे. नागरिक दर पाच वर्षांनी पसंतीच्या (?) उमेदवाराला मतदान करतात.

......पान २ वर




**लाडकी बहीण योजनेचे पैसे खात्यात जमा; 2 महिन्यांचे 3000 रुपये ओवाळणी आली...** (सविस्तर वृत्त पान ३ )



# पालिकेच्यावतीने आशासेविकांकडून तिरंगा यात्रेचे आयोजन




भिवंडी : केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या निर्देशाप्रमाणे शहरात ९ ऑगस्ट क्रांतीदिनापासून हर घर तिरंगा उपक्रमाला सुरूवात झाली आहे. या अंतर्गत वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार हर घर तिरंगा उपक्रम जनजागृती, प्रचार व प्रसार करण्याचा भाग म्हणून पालिकेच्यावतीने तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात येत आहे. पालिका आयुक्त अजय वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय आरोग्य विभाग यांच्या आशा सेविका यांच्यावतीने तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी सदर प्रसंगी तिरंगा प्रतिज्ञा घेऊन तिरंगा यात्रेला सुरुवात केली.

सदर तिरंगा यात्रेचा पद्मश्री अण्णासाहेब जाधव हायस्कूल येथून धामणकर नाक्यावरून महानगरपालिका मुख्यालय येथे समारोप करण्यात आला. वैद्यकीय आरोग्य विभागाच्या वतीने काढण्यात आलेल्या यात्रेत भारत माता की जय, वंदे मातरम याचबरोबर आरोग्य जनजागृती नियमित लसीकरण, क्षयरोग मुक्त भारत, टीबी हरेगा देश जितेगा अशा घोषणा देऊन जनजागृती करण्यात आली. भारत माता की जय, वंदे मातरम, हर घर तिरंगा या घोषणांने वातावरण राष्ट्रभक्तीमय निर्माण झाले.

या यात्रेत पालिका वैद्यकीय आरोग्य अधिकारी बुषरा सय्यद, शहर अभियंता सचिन नाईक, आरोग्य विभाग सहाय्यक आयुक्त फैजल तातली, आरोग्य अधिकारी जयवंत सोनवणे, उद्यान अधीक्षक निलेश संखे, जनसंपर्क अधिकारी मिलिंद पळसुले, क्रीडा अधिकारी शरद कलावंत, आशा सेविका अन्य कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# पर्ससीन मच्छिमारांचे उद्यापासून आंदोलन

## इतर राज्यांप्रमाणे पर्ससीन मासेमारीला परवानगी देण्याची मागणी

उरण : शासनाने इतर राज्याप्रमाणे महाराष्ट्रातील पर्ससीन मासेमारीला परवानगी द्यावी या मागणीसाठी स्वातंत्र्यदिनापासून मासेमारी बंद आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे सरकारविरोधात मच्छिमारांचा संघर्ष तीव्र होण्याची शक्यता वाढली आहे. या आंदोलनात १ हजार २०० पेक्षा अधिक मासेमारी बोटी सहभागी होणार असल्याची माहिती पर्ससीन मच्छिमार संघटनेने दिली आहे. यामुळे पारंपरिक व आधुनिक मासेमारी असा वाद राज्यात निर्माण झाला आहे. मात्र शासनाने या दोन्हींची व्याख्या स्पष्ट करण्याचीही मागणी जोर धरू लागली आहे.

*पर्ससीन मासेमारीवर सरकारने बंदी घातली आहे. मात्र ही बंदी पर राज्यातील मच्छिमारांना नाही. त्यामुळे त्यांच्याकडून पर्ससीन पद्धतीने मासेमारी सुरू आहे. त्यामुळे कोकण किनारपट्टीवरील १ हजार २०० बोटी वर त्याच्या उपजीविका अवलंबून असलेल्या हजारो कामगारांना याचा फटका बसत आहे. त्यामुळे शासनाने पर्सिसीन मासेमारी करणाऱ्यांना परवानगी द्यावी या मागणीसाठी १५ ऑगस्ट पासून मासेमारी बंद आंदोलन करणार असून दोन वर्षांपासून सर्वोच्च न्यायालयात आमची लढाई सुरू आहे.*

***–गणेश नाखवा,*** *अध्यक्ष, वेस्ट कोस्ट पर्ससीन फिशरमेन वेल्फेअर असोसिएशन*

सरकारने राज्याच्या सागरी हद्दीबाहेर पर्ससीन पध्दतीने मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांवर शासनाने अनेक निर्बंध घातले आहेत.यामुळे पर्ससीन मासेमारीवर व्यवसायावर अवलंबून असलेल्या राज्यातील लाखो मच्छीमारांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. सात सागरी जिल्ह्यातील पर्ससीन नेट फिशिंग मच्छीमारांची रविवारी अलिबाग येथे महत्वाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीतच सरकार आणि पर्ससीन व्यावसायिकांनी मासेमारी बंदीचा निर्णय घेतला आहे. राज्यातील मुंबई, मुंबई उपनगर, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या सात जिल्ह्यात सुमारे १२०० बोटी पर्ससीन नेट फिशिंगचा व्यवसाय करीत आहेत. यामध्ये दिवसेंदिवस व्यावसायिकांची संख्येत वाढ होत चालली आहे.

समुद्राच्या तळाशी असलेली नव्हे तर समुद्राच्या पृष्ठभागावर तरंगणारी मासळी या पर्ससीन नेट पध्दतीने मासेमारी करून पकडली जाते. महाराष्ट्र -१२००, गोवा-८००,केरळ-१५००, कर्नाटक -७००, आणि आंध्रप्रदेश अशा विविध राज्यातील सुमारे ३५०० मच्छीमार बोटी राज्याच्या सागरी हद्दीबाहेर म्हणजे १२ नॉटीकल मैलांवर केंद्र सरकारच्या अखत्यारीत असलेल्या सागरी क्षेत्रात पर्ससीन नेट फिशिंग पध्दतीने मासेमारी करतात.

पर्ससीन नेट मासेमारी करण्याची केंद्राची १ ऑगस्ट ते ३१ मेपर्यंत मासेमारी करण्याची मुभा आहे. मात्र राज्य सरकारकडूनच केंद्राच्या अखत्यारीतील १२ नॉटीकल मैलांवर मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांवर कायद्याचा बडगा उगारीत आहे. त्याशिवाय पर्ससीन नेट फिशिंग पध्दतीने मासेमारी करणाऱ्या व्यावसायिकांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यावरही राज्य सरकारने निर्बंध घातले आहेत.



## शासकीय वसतिगृहासाठी अर्ज केला असेल तरच मिळणार स्वाधार योजनेचा लाभ

# महा आयटी पोर्टलवर ३0 ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

ठाणे : सामाजिक न्याय व विशेष विभागाच्यांतर्गत ठाणे जिल्ह्यातील मुलांची ४ व मुलींची-४ अशी एकूण-८ शासकीय वसतिगृहे आहेत. या वसतिगृहांतील रिक्त जागांवर प्रवेश देण्यासाठी महाआयटी पोर्टल सुरू करण्यात आले आहे. या पोर्टलवर अर्ज केल्यानंतर रिक्त जागांवर प्रवेश मिळेल. विशेष म्हणजे या पोर्टलवर वसतिगृहासाठी प्रवेश मिळावा म्हणून अर्ज केला असेल तरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

वसतिगृहासाठी ऑनलाइन पोर्टलवर अर्ज केला आणि वसतिगृहात नंबर नाही लागला तर पुन्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा अर्ज करण्याची गरज नाही. विद्यार्थ्यांना आपोआप वसतिगृहात प्रवेश न झाल्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेकडे विद्यार्थ्यांची नोंद होईल. त्यानंतर त्यांना स्वाधार योजनेचा लाभ मिळेल.

नवीन पोर्टल लिंकचा वापर करून व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी नवीन पोर्टल लिंकचा वापर करून व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी वसतिगृहासाठी प्रवेश करणे सुरू झाले आहे. नियम, अटी व शर्ती यांची माहिती पोर्टलवर उपलब्ध आहे. वसतिगृहात प्रवेश अर्ज भरण्याकरिता व्यवसायीक अभ्यासक्रमाची पदविका प्रथम वर्षात, तसेच थेट व्दितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज करता येईल.

प्रवेश अर्ज भरण्यासाठी व्यावसायिक महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी ३० ऑगस्ट पर्यंतची मुदत देण्यात आलेली आहे. तसेच शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी या पोर्टलद्वारे अर्ज भरलेल्या; परंतु जागे अभवी प्रवेशापासून वंचित राहिलेल्या उर्वरित पात्र विद्यार्थ्यांना या पोर्टलद्वारे भारतरत्न डॉ. बाबासाहेव आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ देण्यात येईल.


शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश घेण्यासाठी, तसेच स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org प्रस्तुत लिंकचा वापर करूनअर्ज भरावे, काही अडचणी उद्धवल्यास स्थानिक गृहप्रमुख, गृहपाल यांच्याकडे संपर्क साधून प्रवेश अर्ज भरावेत, असे आवाहन ठाणे समाज कल्याण सहायक आयुक्त समाधान इंगळे यांनी केले आहे.

## जलवाहिन्यांवर बूस्टरपंप बसविल्यास गृहनिर्माण

# संस्थेवर सिडको कारवाई करणार

पनवेल: अपुऱ्या पाणी पुरवठ्यामुळे गृहनिर्माण संस्थांनी जलवाहिनीवर पाणी खेचण्यासाठी बूस्टरपंप बसवले. त्यामुळे ज्या गृहनिर्माण संस्थांनी बूस्टरपंप बसवले नाही त्यांना थेंबभर सुद्धा पाणी पुरवठा होत नसल्याने लाखो रुपये खर्च करुन या गृहनिर्माण सोसायट्यांना टँकरने पाणी खरेदी करावे लागते. बेकायदा बूस्टरपंपवर नियंत्रणासाठी सिडको मंडळाने मंगळवारपासून खास मोहीम हाती घेऊन खारघर वसाहतीमधील सेक्टर ३४, ३५ येथील गृहनिर्माण सोसायट्यांनी लावलेली बूस्टरपंर हटवले. खारघरप्रमाणे कळंबोली, कामोठे, पनवेल, करंजाडे, द्रोणागिरी या नोडमध्ये ही कारवाई केली जाईल अशी माहिती सिडको मंडळाच्या जनसंपर्क अधिकारी प्रिया रातांबे यांनी दिली आहे. सिडकोने गृहनिर्माण सोसायटीच्या पदाधिका-यांना स्वताहून बूस्टरपंप हटविण्याचे आवाहन केले आहे. सिडकोच्या शोध मोहीमेमध्ये बूस्टरपंप गृहनिर्माण सोसायटीने लावल्याचे आढळल्यास संबंधित गृहनिर्माण सोसायटीवर कायदेशीर कारवाई करु असा इशारा सिडकोच्या जनसंपर्क विभागाने दिला आहे.

# संपादकीय...



संपादक-चंद्रकांत भोईटे

## अभ्यासू युवकांनी राजकारणात यावे

सध्या राजकारणात अनागोंदी निर्माण झाली आहे. नागरिक दर पाच वर्षांनी पसंतीच्या (?) उमेदवाराला मतदान करतात. मग लोकांचा अपेक्षाभंग का होतो ? कारण, मतदार योग्य, कर्तृत्ववान उमेदवाराला मतदान करीत नाहीत. सध्या एखादी निवडणूक लागली तरी पैशाचे आमिष दाखवले जाते. मतदारांना लाच देऊन निवडून आलेले उमेदवार त्याच्या खर्चाची भरपाई करणार हे आपल्या लक्षात का येत नाही ? अनेक कर्तृत्ववान युवक क्रियाशील, हुशार आहेत, परंतु राजकारण हे समाजकारण समजून राजकारणात प्रवेश करणारे दुर्मिळ आहेत. देशातील राजकारणाचा स्तर खालावला आहे. त्यामुळे अभ्यासू, सामाजिक जाणिवेच्या युवा वर्गाने राजकारण सक्रीय होण्याची गरज वाटते.

पूर्वी राजकारणात एकमेकांचा आदर केला जात असे. सध्या अशा गोष्टी राजकारणात दुर्मिळ झाल्या आहेत. तुम्ही पक्षाशी एकनिष्ठ आहात काय ? तुम्ही सर्वसमावेशक राजकारण करणार की संकुचित ? मतदार हा राजा असून जनतेच्या सेवेसाठी राजकारणाचा वापर केला जाईल का, असे अनेक प्रश्न राजकारणी नेत्यांबद्दल जनतेच्या मनात असतात. त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करून विकासाभिमुख व समाजमान्य राजकारण झाले तर देश विकास करू शकेल.

देशातील काही निवडणुकांत लोकप्रतिनिधींचा घोडेबाजार भरवला जातो, तेव्हा जनता आपोआपच गाढव ठरते. राजकारणात सुडाचे राजकारण करणे जनतेलाही दुःखदायक आहे. राजकारणातील मान्यवर नेत्यांकडून जनतेला खूप अपेक्षा आहेत. त्या अपेक्षा पायदळी तुडवणे म्हणजे लोकशाहीची चेष्टा करणे होय. त्याचप्रमाणे जनतेचा विश्वासघात करणे होय. अनेक राजकीय पक्षांतील घराणेशाही, कुरघोडी, गटबाजी, स्वार्थीपणा नेत्यांचे राजकारणातील अवमूल्यन ठरवतात. निकोप लोकशाहीप्रणित भारताचा पाया मूल्याधिष्ठित राजकारण हा आहे, याची जाणीव लोकप्रतिनिधींनी ठेवली पाहिजे. समाजात अनेकजण असे आहेत की, मतदानादिवशी सहलीला जातात. अर्थात ते मतदान करीत नाहीत. ज्या राजकारणावर देशाचे भवितव्य घडते, त्या लोकशाहीच्या पवित्र कार्याकडे म्हणजे मतदानाकडे दुर्लक्ष करणारे करंटे होत. यामुळे चुकीचा उमेदवार निवडून येऊन राजकारणात खोगिरभरती होते. राजकारण हे जनतेचे आणि नेत्यांचेही आहे. दोघांनी राजकारणाची मूल्ये जपली तरच देशाचा विकास होऊ शकतो. राजकारण हेच विकासाचे कारक आहे. समाजाच्या भल्यासाठी विचार करणारी पिढी कुठे हरवली ? तडजोडीचे राजकारण,स्वार्थी महत्वाकांक्षा जोपर्यंत राजकारण्यांच्या वृत्तीत राहणार आहे तोपर्यंत राजकारणाचा हा तमाशा सुरूच राहणार आहे. त्यातून सर्वांनी बोध घ्यावा, ही अपेक्षा आहे. अभ्यासू तरुण पिढीने राजकारणात येण्याची आज गरज निर्माण झाली आहे. अभ्यासू युवकांनी राजकारणात आले तर आजची जशी राजकीय अस्थिरतेची परिस्थिती निर्माण झाली आहे, तशी भवितव्यात होणार नाही. आजचे राजकारण सुडामुळे विकृत झाले आहे. विरोधकांचे शिरकाण करणे, खच्चीकरण करणे असे क्षुद्र प्रयोग सुरू आहेत. राजकारणात आश्वासने देणाऱ्यांचा सुळसुळाट झाला आहे. आश्वासने पूर्ण केली जात नाहीत. यामुळे जनतेला राजकारण्यांचा तिटकारा आला आहे. राजकारणाचा विषय जेव्हा जनतेला नकोसा होतो, तेव्हा लोकशाही धोक्यात येते. म्हणूनच अभ्यासू युवकांनी राजकारणात येण्याची गरज वाटते.



मुख्यमंत्री युवा रोजगार प्रशिक्षण अंतर्गत ठाणे महापालिकेत क्लार्क व शिपाई भरती सुरु आहे यासाठी मोठ्या प्रमाणात युवक, युवतींनी एकच गर्दी केली होती. (छाया : मनोज सिंह)

## विधानसभेसाठी महायुतीचं घोषवाक्य ठरलं, लवकरच फोडणार प्रचाराचा नारळ

**(पान १ वरून)** महायुती राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी आपल्या उमेदवारांचा प्रचार करणार आहे. ठाण्यातील महायुती मेळाव्यात भाजपा आमदार प्रसाद लाड यांनी याबाबत घोषणा केली. ठाण्यात आज महायुती समन्वयक समितीचा मेळावा सुरु आहे, या दरम्यान प्रसाद लाड यांनी ही घोषणा केली आहे. तसंच महायुतीकडून सोशल मीडिया आर्मी देखील तयार करण्यात येणार आहे. फेक नरेटिव्हला उत्तर देण्याचं काम ही सोशल मीडिया आर्मी करणार आहे.

## लाडक्या बहिणींचे पैसे खात्यात जमा

**(पान १ वरून)** ठेपलेल्या रक्षाबंधनचे पवित्र औचित्य साधून स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला महाराष्ट्रातील बहिणींना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळायला सुरुवात झाली आहे. ३१ जुलैपूर्वी अर्ज सादर केलेल्या बहिणींच्या बँक खात्यावर जुलै आणि ऑगस्ट या २ महिन्यांच्या लाभाची रक्कम, प्रत्येकी ३००० रुपये वर्ग करण्यात आले आहेत. ३१ जुलै नंतर अर्ज सादर केलेल्या बहिणींच्या खात्यावरही लवकरच लाभाची रक्कम जमा करण्यात येणार आहे, असे ट्विट आमदार सातपुते यांनी केले आहे.

## ठाण्यात सराफाने उधळला बंदुकधारी दरोडेखोरांचा डाव

**(पान १ वरून)** ठाणे शहरातील बाळकूम नाका,पाडा नं.२ येथील दर्शन ज्वेलर्स या दुकानात बुधवारी सकाळी ११: ३० च्या सुमारास दोन दुचाकीवरून आलेल्या चार सशस्त्र दरोडेखोरांनी बंदुकीच्या धाकावर सोने आणि रोकड चोरण्याचा प्रयत्न केला.मात्र, सराफाने जीवाची पर्वा न करता धैर्याने प्रसंगावधान दाखवत जवळची लाठी घेऊन दरोडेखोरावर प्रतीहल्ला चढवला. अचानक झालेल्या या हल्याने दरोडेखोर चौकडी भांबावली आणि हातात बंदुक असतानाही चौघेही सैरावैरा पळू लागले. दरम्यान, लाठी घेऊन पाठी लागलेल्या सराफाच्या मदतीला धावलेल्या नागरिकांनी चौघांपैकी एकाला पकडुन पोलिसांच्या तावडीत दिले. तर अन्य तिघे पसार झाले.पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या आरोपींची पार्श्वभूमी गुन्हेगारी स्वरूपाची असून त्यांचा गुन्हेगारी कृत्यांमध्ये सहभाग असल्याचा संशय व्यक्त केला आहे. फरार आरोपींना लवकरात लवकर पकडण्यासाठी पोलिसांची विशेष पथके कार्यरत असून, ठाणे शहरात नाकाबंदी करण्यात आली आहे.


## मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय,भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी क्र. ०२२-२८१९२८२८
**बांधकाम / विद्युत विभाग**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/साबां/निविदा/४३/२०२४-२५ दि. १३/०८/२०२४

**// निविदा सुचना क्र. ४३ //**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक बांधकाम / विद्युत विभागाकडील ०३ विकास कामे ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारांविरूध्द शासकीय / निमशासकीय / सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्तभंगाचे कार्यवाहीच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरू आहे. अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सूचना व निविदा प्रपत्र मिरा भाईंदर महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर दि. १६/०८/२०२४ ते दि. २५/०८/२०२४ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महानगरपालिकेचे संकेतस्थळ येथे वर दि. २६/०८/२०२४ रोजी पर्यंत दु.१२.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा दि. २८/०८/२०२४ रोजी दु.१२.३० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

जा.क्र. मनपा/ मावज /E-२५९०९९९/२०२४-२५
दि. १४/०८/२०२४

ठिकाण : भाईंदर
दिनांक : १३/०८/२०२४

सही/-
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

## वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती 'आय' कार्यालय, वसई**
**Prabhagsamitie@gmail.com**
**वसई, जि. पालघर, पिन ४०१ २०१**

दूरध्वनी : २५०-२३०९०२०/२३२२२५८
रुग्णालय : २३२२१२०/२३२३३४३
फॅक्स : ०२०५ - २३२२१२०
जा. क्र. : वविशम/कर.विभाग/वसई/१०१६/२४-२५
दिनांक : १४/०८/२०२४

### जाहिर नोटीस

वसई-विरार शहर महानगरपालिका सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, खालील नमूद मिळकत धारकांनी मालमत्ता हस्तांतरण करणेकामी लेखी अर्ज तसेच कागदपत्रे प्रभाग समिती - आय कार्यालयात सादर केली आहेत. उक्त फेरफार प्रकरणी कोणतीही हरकत/तक्रार असल्यास त्यांनी कार्यालयात जाहीर नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात कागदपत्रासह नोंदवावी. सदर बाबतीत कोणतीही हरकत/तक्रार न आल्यास कार्यालयामार्फत पुढील मालमत्ता हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येईल.

| अ. क्र | विभाग | मालमत्ता क्र. | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजेच विकणा-या किंवा करदात्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | सांडोर | SD03/342/2 | प्रिया लैलेश टूकरूल व लैलेश नरेंद्र टूकरूल | दिनेश निरंजन निर्गूण /अनूश्री दिनेश निर्गूण |
| २ | सालोली | SA05/39 | मायकल इनास परेरा | नेपोलियन मायकल परेरा |
| ३ | कौलार बूद्रूक | KA01/168 | जानमेरी डायगो घोन्सालविस | बॅरिंगटन डायगो घोन्सालविस |
| ४ | कौलार बूद्रूक | KA01/102/1 | वॉल्टर देगिन घोन्सालविस | लिना वॉल्टर घोन्सालविस |
| ५ | कराडी | KD01/41/1 | दत्तात्रेय दादाजी ठाकूर | पराग दत्तात्रेय ठाकूर |
| ६ | कराडी | KD01/41 | दत्तात्रेय दादाजी ठाकूर | पराग दत्तात्रेय ठाकूर |
| ७ | सांडोर | SD02/398 | मॉनिका जसीन डिकूना | शर्मिला रोनाल्ड फरेरा /रोनॉल्ड जोसेफ फरेरा |
| ८ | सांडोर | SD03/141/12 | प्रमीला सी पंडया | अमित जोसेफ घोन्सालविस /निलीमा अमित घोन्सालविस |
| ९ | कौलार बूद्रूक | KA01/102/1 | मॅगदलेना पिटर डीसोजा | शशी पिटर डीसोजा |
| १० | कौलार बूद्रूक | KK01/86/1 | एलायस ईनास घोन्सालविस | मेन्ड्रॉय ईनास घोन्सालविस |
| ११ | सांडोर | SD03/247/27 | आयवन रोमिओ डिकूना | लिब्रेटा विझील रिबेलो |
| १२ | सांडोर | SD03/344/14 | अतोंन जेकब मिनेझीस | आरती अशोक संघवी /जोत्स्ना अशोक संघवी |
| १३ | सांडोर | SD03/146/28 | लूसीयाना फर्नाडीस व फॉबीला फर्नाडीस | मूदर नैयर शमसी |
| १४ | सालोली | SA05/198 | मायकल ईनास परेरा | नेपोलियन मायकल परेरा |
| १५ | कौलार बूद्रूक | KA01/104/1 | किथ जेम्सा मेरीट | ऑब्री जोसेफ मेरीट |
| १६ | कौलार खूर्द | KK01/151/1 | जॉना जॉन फर्नाडीस | अश्मीता डॅरल फर्नाडीस |
| १७ | कौलार खूर्द | KK01/149/1 | पिटर मिगेल कूवेल | विजय पिटर कूवेल |
| १८ | सांडोर | SD02/924/2 | श्रीधर नारायण शेट्टी पंकज | शीतल श्रीधर शेट्टी |
| १९ | सालोली | SA04/174 | मेरी जोसेफ परेरा व प्रेशिला व्हीक्टर परेरा | विनीत विश्वास परेरा |
| २० | सालोली | SA05/283 | सांतान अंतोनी फर्नांडीस | कलीम अब्दूल सत्तार शहा व रमजान अली अब्दूल सत्तार शहा |
| २१ | सालोली | SA04/47 | मेरी जोजेफ परेरा व प्रेशिला व्हीक्टर परेरा | विनीत विश्वास परेरा |
| २२ | गिरिज | GR03/33/2 | श्रीकांत गजानन ठाकुर | पंकज श्रीकांत ठाकुर |

सही/-
प्र.सहा. आयुक्त
प्रभाग समिती 'आय'
वसई-विरार शहर महानगरपालिका

ठाणे, गुरुवार दि. १५ ऑगस्ट २०२४ वर्ष : १३, अंक : १०८ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे संपादक : चंद्रकांत भोईटे




अग्रलेख

**अभ्यासू युवकांनी राजकारणात यावे**

सध्या राजकारणात अनागोंदी निर्माण झाली आहे. नागरिक दर पाच वर्षांनी पसंतीच्या (?) उमेदवाराला मतदान करतात.

......पान २ वर



# लाडकी बहीण योजनेचे पैसे खात्यात जमा

## 2 महिन्यांचे 3000 रुपये ओवाळणी आली...

मुंबई : राज्य सरकारची सर्वात मोठी आणि महत्वाकांक्षी योजना असलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे पैसे महिलांच्या बँक खात्यात जमा होण्यास आजपासूनच सुरुवात झाली आहे.

राज्य सरकारे १७ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन सणाच्या पार्श्वभूमीवर जुलै व ऑगस्ट या दोन महिन्यांचे ३००० रुपये एकाच दिवशी जमा होणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

मात्र, आजपासूनच ही रक्कम लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली आहे. भाजप आमदार राम सातपुते यांनी ट्विट करुन याबाबत माहिती दिली. तसेच, महिलांच्या बँक खात्यात रक्कम जमा झाल्याचे स्क्रीनशॉटही शेअर केले आहेत. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दोन्ही उपमुख्यमंत्री सध्या आपल्या भाषणातून या योजनेबाबत जनजागृती करत असून विरोधकांच्या टीकेलाही उत्तर देत आहेत.

बहिणींना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा प्रत्यक्षात लाभ मिळायला सुरुवात झाली आहे. ३-४ दिवसांवर येऊन (पान २ वर)



### राज्यात १ कोटी ४० लाख महिलांची नोंदणी पूर्ण

मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना चालू होऊन एक महिनाही झालेला नाही. राज्यात १ कोटी ४० लाख महिलांची नोंदणी पूर्ण झाली आहे. शासन-प्रशासनाच्या मेहनतीमुळं हे शक्य झाल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू करण्यासाठी शासन स्तरावर दहा महिन्यांपासून काम सुरू होते. या योजनेसाठी ३३ हजार कोटी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. ही यापुढेही कायम सुरूच राहणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं आहे. तसेच, ज्या महिला भगिनींना या दोन महिन्यांचा लाभ मिळाला नाही, त्यांना सप्टेंबर महिन्यात एकूण ३ महिन्यांचा थेट लाभ मिळणार असून ४५०० रुपये त्यांच्या बँक अकाऊंटवर जमा होतील, असेही मुख्यमंत्री शिंदेंनी सांगितलं आहे.

## गणेशभक्तांसाठी आनंदाची बातमी! गावी जाणाऱ्या भक्तांना यंदाही टोल माफी ...



मुंबई : गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गणेश भक्तांना टोलमाफी देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. त्यासंबधीचा शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला आहे. दरम्यान, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदारांना खुश करण्याचा प्रयत्न शिंदे गटाकडून होत असल्याचं पाहायला मिळत आहे. गणेशोत्सवासाठी गावी जाणाऱ्या गणेशभक्तांना टोलमाफी करण्याचा निर्णय मुख्यमंत्री शिंदे यांनी घेतला आहे. तसेच गणपती आगमन आणि विसर्जन मार्गावरील खड्डे तातडीने बुजवण्याचे असे आदेश दिले आहेत. राज्यात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा. गणेशोत्सवापूर्वी गणपती आगमन आणि विसर्जन मार्गावरील खड्डे तातडीने बुजवावेत त्यासाठी रॅपीड क्वीक सेटिंग हार्डनर-एम सिक्टी या आधुनिक साहित्याचा वापर करावा. झाडांच्या फांद्याची छाटणी करावी. कृत्रिम तलावांची संख्या वाढवावी. मोठ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या ठिकाणी आरोग्य पथक, रुग्णवाहिका, अग्निशमन वाहन तैनात करावेत असे निर्देश देऊन गणेशोत्सवासाठी गावी जाणाऱ्या गणेश भक्तांना यंदाही टोल माफीचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केला.

## विधानसभेसाठी महायुतीचं घोषवाक्य ठरलं, लवकरच फोडणार प्रचाराचा नारळ

मुंबई - विधानसभा निवडणूक आता अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. महायुती आणि महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी निवडणुकीची तयारी सुरू केल्याचं पाहायला मिळत आहे. महायुतीनं प्रचारात आघाडी घेतील असून विधानसभा निवडणुकीसाठी घोषवाक्य देखील ठरवण्यात आलं आहे. 'एकजुट महाराष्ट्रासाठी अभियान, विकासासाठी कल्याणासाठी' हे घोषवाक्य घेवून महायुती राज्यभर आपल्या उमेदवारांचा प्रचार करणार आहे. ठाण्यातील महायुती मेळाव्यात भाजपा आमदार प्रसाद लाड यांनी याबाबत घोषणा केली. ऋ'एकजुट महाराष्ट्रासाठी अभियान, विकासासाठी कल्याणासाठी' हे घोषवाक्य घेवून (पान २ वर)

### २४ ऑगस्टला फोडणार प्रचाराचा नारळ

दरम्यान २४ ऑगस्टला विधानसभेसाठी महायुतीच्या प्रचाराचा नारळ फुटणार आहे. २४ ऑगस्टपासून प्रचाराला सुरुवात होणार आहे. ठाण्यातून पहिली प्रचार यात्रा निघणार आहे. तीन दिवस ही प्रचार यात्रा चालणार आहे. ठाणे, पालघर, नवी मुंबई अशी ही महायुतीची प्रचार यात्रा असणार आहे.

## अभिनेते शिवाजी साटम आणि अभिनेत्री आशा पारेख यांना राज्य सरकारचा जीवनगौरव पुरस्कार

मुंबई- राज्य सरकारकडून महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांची घोषणा झाली आहे. अभिनेता शिवाजी साटम आणि अभिनेत्री आशा पारेख यांना राज्य सरकारचा जीवनगौरव पुरस्कार जाहिर केला असून दिग्दर्शक एन. चंद्रा यांचाही गौरव होणार आहे. यासोबत राज्य सरकारकडून इतरही पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. या पुरस्कारामध्ये सन्मानचिन्ह आणि रोख रक्कम याचा समावेश आहे.

चित्रपट सृष्टीसाठी महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने देण्यात येणारे पुढील पुरस्कार जाहिर करण्यात आले आहेत. २०२३ मधील चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार जेष्ठ अभिनेते शिवाजी साटम यांना जाहिर करण्यात आला आहे. तर २०२३ स्व.राज कपूर जीवनगौरव पुरस्कार जेष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांना जाहिर करण्यात आला आहे.

यासोबतच, २०२३ सालचा चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार लेखक-दिग्दर्शक तसेच अभिनेते दिग्पाल लांजेकर यांना जाहिर करण्यात आला आहे. २०२३ वर्षातील स्व.राज कपूर विशेष योगदान पुरस्कार जेष्ठ लेखक- दिग्दर्शक-संकलक एन.चंद्रा यांना जाहीर करण्यात आला आहे.

चित्रपट सृष्टीसाठी महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने देण्यात येणारे पुरस्कार जाहिर करण्यात आले आहेत. ५८ आणि ५९ व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांच्या अंतिम फेरीची नामांकनांची यादी समोर आली आहे. सन २०२० सालाच्या ५८ व्या राज्य चित्रपट महोत्सवाच्या अंतिम फेरीसाठी मी वसंतराव, फास, बापल्योक, गोष्ट एका पैठणीची, बीटर स्वीट कडुगोड, जयंती, चोरीचा मामला, सुमी, फनरल, गोदाकाठ या दहा चित्रपटांना सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार जाहिर करण्यात आला आहे. तसेच प्रथम पदार्पण चित्रपट निर्मिती आणि दिग्दर्शनासाठी जून, जयंती, फनरल या तीन चित्रपटांना पुरस्कार जाहिर करण्यात आला आहे.

सन २०२१ सालाच्या ५९ व्या राज्य चित्रपट महोत्सवाच्या अंतिम फेरीसाठी तिचं शहर होणं, एकदा काय झालं, गोदावरी, फ्रेम, कारखानिसांची वारी, इरगल, येरे येरे पावसा, बाल भारती, राख, बाईपण भारी देवा या दहा चित्रपटांना सर्वोत्कृष्ट चित्रपटाच्या पारितोषिकासाठी नामांकने जाहीर करण्यात आली आहेत. तसेच प्रथम





पदार्पण चित्रपट निर्मिती करीता जननी, लकडाऊन be positive, आता वेळ झाली आणि दिग्दर्शनाकरीता तिचं शहर होणं, फ्रेम, कुलूप या तीन चित्रपटांना पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे.

## ठाण्यात सराफाने उधळला बंदुकधारी दरोडेखोरांचा डाव

### चौकडीपैकी एकजण तावडीत

**ठाणे – ठाण्यात बंदुकीच्या धाकावर सराफाच्या दुकानावर दरोड्याचा प्रयत्न करणाऱ्या चौकडीचा डाव सराफाने उधळला. यावेळी लाठी घेऊन सराफाने पाठलाग केल्याने नागरिकांनी एकाला पकडुन पोलिसांच्या तावडीत दिले तर अन्य, तिघे दरोडेखार पसार झाले. हा प्रकार सीसी टिव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून या फसलेल्या दरोडयाची खमंग चर्चा सोशल मिडियात रंगली आहे. दरग्यान या फसलेल्या दरोड्या प्रकरणी कापुरबावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.** (पान २ वर)




### दर्शन ज्वेलर्समध्ये काय घडल...बघ्याचे कथन

बाळकुम येथील दर्शन ज्वेलर्स दरोडा प्रकरणात सीसीटीव्ही मध्ये काय काय झालं याबाबतचा खुलासा दर्शन ज्वेलर्सच्या काउंटरवर एक व्यक्ती कार्यरत असताना दिसत असून मुखवटा धारण केलेल्या चार व्यक्ती अचानक दुकानात घुसतात आणि काउंटरवरील त्या व्यक्तीला बंदूक रोखून बोलत असतानाच चपळतेने काठीच्या साह्याने काउंटर वरील इसमाने मुखवटाधारी याच्यावर काटे उभा राहन हल्ला करण्याचा प्रयत्न केला आणि बिथरलेल्या चारी लुटारू बंदुकीच्या दुकानाच्या बाहेर पळण्याच्या खटाटोपात तीन लुटारू हे पळून जाण्यात यशस्वी झाले तर दुकानातून काउंटरवरील काठी घेऊन पाठलाग करणाऱ्या इसमामुळे चौथा आरोपी हा स्थानिक नागरिकाच्या मदतीने जेरबंद करून कापूरबावडी पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आल्याची माहिती प्रत्यक्षदर्शी यांनी सांगितले अधिक तपास कापूर बावडी पोलीस पोलीस करीत आहेत.

## देशातील सर्व मीठ-साखर ब्रँडमध्ये आढळते मायक्रोप्लास्टिक

**मुंबई – प्रक्रियायुक्त अन्नपदार्थातील अतिरिक्त मीठ आणि साखरेच्या सेवनामुळे जगभरातील लोक गेल्या दशकभरापासून अनेक आजारांना सामोरे जात आहेत. नेहमीच्या आहारातून या पदार्थांचे प्रमाण कमी करा, असा सल्लाही आहारतज्ज्ञांकडून वारंवार दिला जातो. मात्र आता या मीठ-साखरेच्या निर्मितीमध्ये होणारी एक अत्यंत गंभीर बाब समोर आली आहे. देशात विकल्या जाणाऱ्या प्रत्येक ब्रँडच्या मीठ आणि साखरेच्या पॅकेटमध्ये मायक्रोप्लास्टिक्स असतात. हे ब्रँड लहान असोत किंवा मोठे आणि पॅकेज केलेले असोत किंवा अनपॅक केलेले असोत, त्या सर्वांमध्ये मायक्रोप्लास्टिक्स असतात. काल प्रसिद्ध झालेल्या एका अभ्यासात हा दावा करण्यात आला आहे.**





'मायक्रोप्लास्टिक्स इन सॉल्ट अँड शुगर' नावाचा हा अभ्यास टॉक्सिक्स लिंक नावाच्या पर्यावरण संशोधन संस्थेने तयार केला आहे. टेबल मीठ, रॉक सॉल्ट, समुद्री मीठ आणि स्थानिक कच्चे मीठ आणि ऑनलाइन आणि स्थानिक बाजारातून खरेदी केलेल्या पाच प्रकारच्या साखरेसह १० प्रकारच्या मीठांची चाचणी केल्यानंतर या संस्थेने हा अभ्यास सादर केला आहे.

मीठ आणि साखरेच्या सर्व नमुन्यांमध्ये विविध प्रकारचे मायक्रोप्लास्टिक्स असल्याचे या अभ्यासातून समोर आले आहे. जसे की तंतू, गोळ्या आणि तुकडे. या मायक्रोप्लास्टिक्सचा आकार ०.१ मिमी ते ५ मिमी दरम्यान आढळून आला. आयोडीनयुक्त मीठामध्ये मायक्रोप्लास्टिक्सचे सर्वाधिक प्रमाण आढळले, जे बहुरंगी पातळ तंतू आणि फिल्म्सच्या स्वरूपात होते.

या संशोधनाबाबत खुलासा करताना टॉक्सिक्स लिंकचे संस्थापक-संचालक रवी अग्रवाल म्हणाले की, आमच्या अभ्यासाचा उद्देश मायक्रोप्लास्टिक्सवर सध्या उपलब्ध असलेल्या वैज्ञानिक डेटामध्ये योगदान देणे हा आहे, जेणेकरून जागतिक प्लास्टिक करार या समस्येचे निराकरण करू शकेल. या अभ्यासानंतर धोरण तयार करण्याच्या दिशेने काम सुरू व्हावे आणि मायक्रोप्लास्टिकचा धोका कमी करणाऱ्या तंत्रज्ञानाकडे संशोधकांचे लक्ष जावे, असा आमचा उद्देश असल्याचेही त्यांनी सांगितले.



पद्मश्री शंकर महादेवन यांचा 'घरोघरी तिरंगा' अभियानात सहभाग

## नागरिकांना तिरंगा फडकविण्याचे केले आवाहन



नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ९ ते १५ ऑगस्ट २०२४ या कालावधीत 'घरोघरी तिरंगा' अर्थात 'हर घर तिरंगा' अभियान विविध उपक्रमांचे आयोजन करीत व्यापक स्वरूपात राबविण्यात येत आहे.
यामध्ये स्वच्छ नवी मुंबई मिशनचे महानगरपालिका ब्रँड म्बेसेडर सुप्रसिध्द गायक, संगीतकारशंकर महादेवन यांनी सहभागी होत महापालिका मुख्यालयातील भेटीप्रसंगी तिरंग्यासह सेल्फी काढत तसेच तिरंगा कॅनव्हासवर स्वाक्षरी करून घरोघरी तिरंगा अभियानात सहभागी होत नागरिकांना १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत आपले घर, कार्यालयात तिरंगा फडकविण्याचे आवाहन केले.
यावेळी त्यांनी नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्यासह तिरंगा ध्वज हातात धरून झळकवत राष्ट्राभिमान दर्शविला आणि नागरिकांनाही आपल्या देशाविषयीचे प्रेम व्यक्त करण्याची चांगली संधी घरोघरी तिरंगा अभियानाच्या माध्यमातून उपलब्ध झाली असल्याचे सांगितले.

# आतकोली क्षेपणभूमीतील राखीव क्षेत्र सुव्यवस्थित ठेवावे

### महापालिका आयुक्त सौरभ राव यांचे निर्देश

### आयुक्त राव यांनी केली आतकोली येथील क्षेपणभूमी क्षेत्राची पाहणी

ठाणे : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे महापालिकेस क्षेपणभूमी तयार करण्यासाठी मौजे आतकोली येथे जागा उपलब्ध करून दिली आहे. या जागेची पाहणी मंगळवारी सायंकाळी महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केली. या क्षेपणभूमी परिसरासभोवतालचे राखीव क्षेत्र (बफर झोन) सुव्यवस्थित ठेवावे, असे निर्देश त्यांनी घनकचरा व्यवस्थापन विभागास दिले. क्षेपणभूमी परिसराचा कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, असे आयुक्त राव यांनी या पाहणी दरम्यान स्पष्ट केले. तसेच, क्षेपणभूमीत कचरा येत असताना वाहतुकीचे व्यवस्थित नियोजन करून गाड्यांची ये-जा जलद होईल, याची व्यवस्था करण्यात यावी. येथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आवश्यक असलेल्या सोयीसुविधा तातडीने उभ्या केल्या जाव्यात. घनकचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने व्यवस्थापन व्हावे. त्यात कोणतीही त्रुटी राहता कामा नये, असे स्पष्ट निर्देश आयुक्त राव यांनी या पाहणीनंतर दिले.



राज्य शासनाने ठाणे महापालिकेस मौजे आतकोली येथे शास्त्रोक्त पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी जागा हस्तांतरित केली आहे. या जागेचा ताबा ठाणे महापालिकेला प्राप्त झाला असून त्याची हद्द निश्चिती पूर्ण झाली आहे. या जागेवर घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी एकात्मिक प्रकल्प उभारण्यात येत आहे. या प्रकल्पाची जागा, त्याची रचना, घनकचऱ्याची वाहतूक व्यवस्था याची माहिती आयुक्त राव यांनी घेतली.
या पाहणी दौऱ्याच्या वेळी अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त (घनकचरा) तुषार पवार, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, उपनगर अभियंता गुणवंत झांब्रे, कार्यकारी अभियंता भगवान शिंदे आदी उपस्थित होते.
ठाणे महापालिका क्षेत्रातील घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी दिवा येथील क्षेपणभूमीचा वापर करण्यात येत होता. या क्षेपणभूमीची क्षमता जानेवारी २०२३मध्ये संपुष्टात आली. त्यानंतर, डायघर येथे ऑक्टोबर २०२३ मध्ये पूर्व प्रक्रिया केंद्र सुरू करण्यात आले. मात्र त्या प्रकल्पात काही तांत्रिक बदल करावे लागल्याने हा प्रकल्प तुर्तास बंद आहे. हा प्रकल्प लवकरच सुरू करण्यात येणार आहे. दरम्यान, भांडार्ली येथे सुरू करण्यात आलेल्या क्षेपणभूमीची क्षमताही मर्यादित आहे.
ठाणे महापालिका क्षेत्रातील घनकचऱ्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावण्यासाठी नवीन जागेची निकड निर्माण झाल्याने राज्य शासनाकडे जागेची मागणी नोंदवण्यात आली होती. त्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यातून मौजे आतकोली येथील जागा घनकचरा व्यवस्थापनासाठी उपलब्ध झाली आहे. या जागेवर कचऱ्याचे शास्त्रोक्त व्यवस्थापन होऊ लागल्याने ठाणेकरांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## सिडकोच्या विद्यावेतनाची प्रतीक्षा

### चार हजारांपैकी अवघ्या ४५० विद्यार्थ्यांना विद्यावेतन मंजूर

उरण : नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांच्या वारसांना सिडकोकडून दिल्या जाणाऱ्या २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाच्या विद्यावेतनाची विद्यार्थ्यांना वर्षभरापासून प्रतीक्षा आहे. सध्या उरण व पनवेल या दोन तालुक्यातील विद्यार्थ्यांना हे विद्यावेतन दिले जात असून जवळपास ४ हजार विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. यातील अवघ्या ४५० विद्यार्थ्यांना विद्यावेतन मिळाले आहे.
नवी मुंबई शहराच्या उभारणीसाठी ठाणे जिल्ह्यातील बेलापूर पट्टी व रायगड जिल्ह्यातील उरण - पनवेल तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी सिडकोने संपादीत केल्या आहेत. या जमिनीच्या मूळ मालकांच्या (शेतकऱ्यांच्या) मुलगा,सून आणि नातू या वारसांना त्यांचे शिक्षण पूर्ण करता यावे यासाठी सिडकोकडून विद्यावेतन दिले जात आहे. १९७५ पासून हे विद्यावेतन सुरू करण्यात आले आहे. यामध्ये कनिष्ठ महाविद्यालय ते पदव्युत्तर तसेच उच्च शिक्षणासाठी हे विद्यावेतन दिले जात आहे. दरवर्षी १० टक्के वाढीने दिले जाणारे विद्यावेतन सध्या वार्षिक १२ हजार रुपये आहे. यासाठी विद्यार्थ्यांना महाविद्यालयातून अर्ज करावे लागत आहेत. ते सिडकोच्या पुनर्वसन विभागाकडून तपासून नंतर विद्यावेतन दिले जात आहे. २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात साडेतीन हजार विद्यार्थ्यांना लाभ झाला आहे. तर २०२३-२४ या वर्षात जवळपास ४ हजार विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. नव्याने २०२४- २५ चे शैक्षणिक वर्षं सुरू झाले असतांनाही २३-२४ या वर्षातील विद्यावेतन न मिळाल्याने विद्यार्थ्यांना सिडकोकडे हेलपाटे मारावे लागत आहेत. यासंदर्भात सिडकोच्या पुनर्वसन विभाग व जनसंपर्क अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता प्रतिसाद मिळाला नाही.

#### ठाणे जिल्ह्यातील विद्यावेतन बंद

यातील सिडकोने ठाणे जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांच्या वारसांना दिले जाणारे विद्यावेतन बंद केले आहे. ते सुरू करण्याची मागणी केली जात आहे. पन्नास वर्षांपूर्वी सिडकोने विद्यावेतन सुरू करताना केवळ मूळ जमीन मालकांच्या नातवापर्यंत ही सवलत दिली होती. मात्र राज्य सरकारने जमीन संपादना केल्यानंतर प्रकल्पग्रस्त दाखला देण्यासाठी मूळ जमीनधारकाच्या खापरपणतूपर्यंत सवलत देणारा शासनादेश काढला आहे. त्यानुसार विद्यावेतन ही देण्याची मागणी प्रकल्पग्रस्तांनी केली आहे.

## आरोपी महिलेस अटक

कल्याण: मुलाच्या बारावी प्रवेशाचे शुल्क भरण्यासाठी विठ्ठलवाडी येथील एका महिलेने शहाड रेल्वे स्थानकात एका प्रवासी महिलेच्या गळ्यातील सोनसाखळी चोरली. ही सोनसाखळी बाजारात विकून त्यामधून मिळणाऱ्या पैशातून मुलाचे महाविद्यालयीन शुल्क भरण्याचे महिलेने ठरविले. पण कल्याण लोहमार्ग पोलिसांनी प्रवासी महिलेच्या दाखल तक्रारीवरून चोरट्या महिलेला विठ्ठलवाडी परिसरातून अटक केली. राणी भोसले (४२) असे या महिलेचे नाव आहे. ती मूळची छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी आहे. पहिल्या पतीने घटस्फोट दिल्याने राणी भोसले हिच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. तिला तीन मुलगे, एक मुलगी आहे.

## पर्यावरणपूरक गणेश मूर्तिकारांना अनुदानाची प्रतीक्षा कायम

उरण : गणेशोत्सवाला अवघा महिना उरला असून गणेश मूर्तिकारांची लगबग सुरू आहे. शासनाने शाडूच्या पर्यावरणपूरक मूर्ती बनविण्याची व पर्यावरण राखण्याची घोषणा केली आहे. मात्र शेकडो वर्षे शाडूच्या मूर्ती तयार करणाऱ्यांना कोणत्याही प्रकारचे अनुदान न देता सरकार उपेक्षा करीत आहे, तर दुसरीकडे शाडूच्या मातीच्या किमतीतही १५ रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळे पर्यावरणपूरक मूर्ती तयार करणाऱ्यांना अनुदानाची प्रतीक्षा आहे. पर्यावरण रक्षणासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळ लाखो रुपये खर्च करीत आहे. मात्र मूर्तिकार अनुदानापासून वंचित आहेत.
प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती स्वस्त आणि पाण्यात विरघळत नसतानादेखील परवडत असल्याने त्यांना अधिक मागणी आहे. मात्र महागाई असली तरी चिरनेरमधील ओमकार कला केंद्रामध्ये गणेशभक्तांची मे महिन्यापासून ये-जा सुरू होते. त्याचे कारण म्हणजे फोटोप्रमाणे गणेशमूर्ती तयार करून दिल्या जात असल्याने, या कारखान्यात गणेशभक्त ऑर्डरसाठी येत असतात, अशी माहिती ओमकार कला केंद्राचे भाई चौलकर, संदेश चौलकर यांनी दिली. दरम्यान महागाई वाढली असली तरी गणेशभक्तांकडून शाडूच्या पर्यावरणपूरक शाडू मातीपासून तयार केलेल्या गणेशमूर्तींना विशेष मागणी आहे. चिरनेर येथे घडविल्या जाणाऱ्या गणेशमूर्तींच्या कारखान्याला शंभर वर्षाहून अधिक वर्षांची परंपरा आहे. चिरनेर कुंभारपाडा हा खास गणपती बाप्पाच्या मूर्ती व मातीची भांडी बनविण्यासाठी प्रसिद्ध आहे. दरम्यान या कुंभार पाड्यात शाडूच्या मातीचे म्हणजे पर्यावरणपूरक मातीपासून बनविल्या जाणाऱ्या गणेशमूर्तींचे निवडक कारखाने आहेत. आज या सर्वांची तिसरी, चौथी, पाचवी पिढी शाडू मातीपासून मूर्ती घडवीत आहे.

पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनविण्यासाठी लागणाऱ्या शाडूच्या मातीच्या किमतीत १५ रुपयांनी वाढ झाली आहे. तर मजुरांची मजुरीही दोन हजारांनी वाढली आहे. त्यामुळे गणेशमूर्तींच्या किमती वाढल्या आहेत. मूर्तिकारांच्या संघटनेने मागणी करूनही शासनाने अनुदान दिलेले नाही.
**–मनोहर पवार, मूर्तिकार**

## पनवेलमध्ये १२ हजार हेक्टर भातशेती हद्दपार

पनवेल : पनवेल तालुक्यातील गावांचे रूपांतर विकसनशील शहरामध्ये होत असल्याने मागील वर्षीच्या तुलनेत यापुढे तालुक्यातील सहा हजार हेक्टरवरील भातशेती नष्ट होण्याच्या वाटेवर आहे. मुंबईतील वाढत्या लोकसंख्येसाठी पर्याय म्हणून नवी मुंबईनंतर पनवेलचा शहर म्हणून विकास केला जात आहे.
निवासी व औद्योगिक वापरासाठी पालिका क्षेत्रातील शेतकऱ्यांना विकासक होण्याची संधी मिळाली असली तरी पारंपरिक शेतीवर पाणी सोडण्याची वेळ आली आहे.
शेतकऱ्यांना प्रारूप आराखड्याबद्दल हरकती व सूचना नोंद करण्यासाठी पालिकेने ८ सप्टेंबरपर्यंत वेळ दिली आहे. दहा वर्षांपूर्वी १५ हजार हेक्टरवर भातशेती केली जात होती. यंदा सहा हजार हेक्टरवर भातपीक घेतले आहे. पनवेल महापालिकेने आगामी २० वर्षांत वाढत्या लोकसंख्येचा अंदाज धरून शहराचा प्रारूप विकास आराखडा तयार केला असून यातील १२ हजार हेक्टर शेतजमिनीपैकी ७० टक्के जमिनींवर निवासी क्षेत्राचे आरक्षण करण्यात आले आहे.
पालिका क्षेत्रातील १८ गावांवर या आराखड्याचा थेट प्रभाव पडणार असल्याने याचे सामाजिक व राजकीय दीर्घ परिणाम येथील ग्रामस्थांवर होणार आहेत. १२ हजार हेक्टर शेतजमिनींचे राखणदार असलेल्या शेतकऱ्यांना पनवेलच्या विकासात स्वत:चे राहणीमान उंचावण्याचीही संधी मिळेल, पण पारंपरिक शेती काही वर्षांत पनवेलमधून हद्दपार होणार आहे.

## ई-बाईक व सायकलच्या इकोफ्रेंडली तिरंगा रॅलीतून देशभक्तीसह पर्यावरणशील संदेश प्रसारण

नवी मुंबई : संपूर्ण देशभरात ९ ते १५ ऑगस्ट २०२४ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या 'घरोघरी तिरंगा' अर्थात 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणात करण्यात आले आहे. यामध्ये विभागाविभागात तिरंगा रॅली, तिरंगा यात्रा आयोजित करण्यात आलेल्या असून त्यामध्ये विद्यार्थी, महिला, युवक, नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत.
अशाच प्रकारचा ई - बाईक आणि सायकलसह इकोफ्रेंडली तिरंगा रॅलीचा एक अभिनव उपक्रम मुख्यालय स्तरावर राबविण्यात आला. यामध्ये ५० हून अधिक नागरिक व स्वच्छताकर्मी यांनी आपल्या सायकल तसेच युलू ई बाईक घेऊन सहभागी होत 'भारतमाता की जय' या सोबतच स्वच्छतेच्या अनुषंगाने 'निश्चय केला, नंबर पहिला' अशा घोषणा देत ही रॅली यशस्वी केली. महापालिका मुख्यालय इमारतीपासून नेक्सस मॉलपर्यंत काढण्यात आलेल्या या इकोफ्रेंडली तिरंगा रॅलीत नवी मुंबईतील अनेक सायकलप्रेमी उत्साहाने सहभागी झाले होते. घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे व क्रीडा आणि सांस्कृतिक कार्य विभागाच्या उपआयुक्त श्रीम. अभिलाषा म्हात्रे - पाटील यांनी झेंडा दाखवून रॅलीस प्रारंभ केला. याप्रसंगी बेलापूर विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी शशिकांत तांडेल, स्वच्छ नवी मुंबई मिशनच्या महानगरपालिकेच्या वुमेन आयकॉन श्रीम. रिचा समित उपस्थित होत्या.



या इकोफ्रेंडली तिरंगा रॅलीच्या माध्यमातून देशभक्तीचा संदेश प्रसारित करण्यासोबतच ई - बाईक, सायकल अशा पर्यावरणपूरक वाहनांचा नागरिकांनी वापर वाढवावा व प्रदूषण रोखून पर्यावरण संरक्षणात आपला हातभार लावावा हा संदेश प्रसारित करण्यात आल्याचे घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे यांनी सांगितले. यावेळी सामुहिकरित्या तिरंगा प्रतिज्ञा तसेच स्वच्छतेची शपथ घेऊन रॅलीची यशस्वी सांगता करण्यात आली. याप्रसंगी उपस्थितांनी तिरंगा सेल्फी स्टँडवर मोठ्या प्रमाणात सेल्फी छायाचित्रे काढली तसेच घरोघरी तिरंगा कॅनव्हासवर स्वस्वाक्षरी करून अभियानात सहभाग नोंदविला.




'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१